# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.10.2025** **वार:बुधवार**

1. राज्याचं बांबू धोरण जाहीर; 50 हजार कोटींची गुंतवणूक आणि पाच लाखांवर रोजगार निर्मितीची अपेक्षा
2. खड्ड्यांमुळे अपघाती मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबांना 6 लाख रुपये देण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे महानगरपालिकांना आदेश
3. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत VVPATचा वापर करण्याची विरोधी पक्षांची मागणी आणि
4. दिल्ली क्रिकेट कसोटीतील विजयासह भारतानं वेस्ट इंडिज विरुद्धची मालिका जिंकली

**<u>मंत्रिमंडळ निर्णय</u>**

राज्यातील शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण 2025 ला काल मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या द पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक संस्था, वसतिगृह इत्यादींचा जीर्णोद्धार, जतन आणि संवर्धन करण्याच्या प्रस्तावालाही काल मान्यता मिळाली. या कामासाठी 5 वर्षांकरता 500 कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात येणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद पीठांकरता नवीन पदनिर्मिती करण्यासाठीच्या निधी तरतुदीलाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या न्यायालयांकरता गट अ ते गट ड पर्यंत मिळून 2 हजार 228 पदं निर्माण करण्यात येणार आहेत.

**<u>बांबू धोरण</u>**

राज्यात बांबू लागवड आणि प्रक्रीया उद्योगाला चालना देण्यासाठी यंदा शासनानं विशेष बांबू धोरण जाहीर केलं आहे. ऐकुया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**बांबू लागवड आणि प्रक्रिया क्षेत्रात सरकार 50 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. त्यात 5 लाखापेक्षा जास्त रोजगार निर्मिती होईल अशी अपेक्षा आहे. या अंतर्गत राज्यात 15 समर्पित बांबू क्लस्टर्स तयार करण्यात येतील तसंच कार्बन क्रेडिट बाजारपेठेचा लाभ या उद्योगाला मिळेल. शेतकऱ्यांना नगदी पिकासारखा शाश्वत आणि पर्यावरणपुरक पर्याय यामुळे मिळू शकेल. पुढील पाच वर्षांच्या कालावधीत हे धोरण राबविले जाईल. या धोरणात बांबू शेतकरी उत्पादक संघटना, कंत्राटी शेती आणि ऊर्जा, उद्योग आणि इतर घरगुती क्षेत्रांमध्ये बांबूच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यासाठी पायाभूत सुविधा म्हणून अँकर युनिट्स आणि सामायीक सुविधा केंद्रसुरु करण्यात येणार आहेत. बांबू क्षेत्रातील नवोन्मेषावर आधारित स्टार्टअप्स आणि सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांसाठी व्हेंचर भांडवल निधी म्हणून तीनशे कोटी रुपयांच्या तरतुदीलाही मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्रात बांबू लागवडीखालील क्षेत्र हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचं आहे. सध्या अमरावती, सिंधुदुर्ग आणि भंडारा जिल्ह्यात उत्पादनाच्या दृष्टीने बांबू क्लस्टर्स आहेत. महाराष्ट्रात लागवडीयोग्य पडीक जमीन आणि पडीक जमीन लक्षात घेता, बांबू उत्पादनाची क्षमता दरवर्षी सुमारे 157 पूर्णांक 12 लाख टन होऊ शकते. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी पुण्याहून संध्या खान.**

**नुकसान भरपाई**

राज्यात रस्त्यावरच्या खड्ड्यांमुळे अपघात होऊन मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना 6 लाख रुपये नुकसानभरपाई द्यायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं काल संबंधित महानगरपालिकांना दिले. तसंच, अशा दुर्घटनांमध्ये जखमी झालेल्यांना 50 हजार ते अडीच लाख रुपयांपर्यंत नुकसानभरपाई द्यावी, असंही न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरेआणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या पीठानं सांगितलं. चांगले आणि सुरक्षित रस्ते हा राज्यघटनेच्या कलम 21 अंतर्गत नागरिकांच्या जगण्याच्या हक्काचा भाग आहे, याचा पुनरुच्चारही पीठानं केला.

**भूमिपूजन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबईत घाटकोपर पूर्व इथं माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचं काल भूमिपूजन करण्यात आलं. हा प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिली. या प्रकल्पामुळे रहिवाशांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. धारावीतील 10 लाख लोकांना 7 वर्षात हक्काचं घर मिळेल तसंच त्याच ठिकाणी 2 लाख लोकांना रोजगार मिळेल अशी व्यवस्था केली जाईल अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

**सोलापूर विमानतळ**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज मुंबईतूनविमानाने सोलापूरमध्ये स्वतः प्रवास करून या विमानसेवेचा प्रारंभ करणार आहेत. आजपासूनसोलापूर ते मुंबई आणि सोलापूर ते गोवा ही विमानसेवा आता सातत्याने सुरु राहणार असल्याचंआमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**धम्मचक्र दिन-नागपूर**

नागपूरच्या दीक्षाभूमी इथ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी आपल्या लाखो अनुयाया सोबत बुद्ध धम्माचा स्वीकार केला होता. त्या दिवसाला धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून ओळखले जाते. दसऱ्याच्या दिवशी बाबासाहेबांनी ही दीक्षा घेतली असल्यामुळे विजयादशमीला हा दिवस साजरा केला जातो. परंतु तारखेनुसारही काल हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्त नागपूरच्या दीक्षा भूमी इथ बुद्ध वंदनेसाठी हजारो अनुयायी दाखल झाले होते.

**विरोधीपक्ष-मुंबई**

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी काल राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांची भेट घेऊन त्यांना एक निवेदन सादर केलं. मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत VVPAT वापरावं, जुलै 2025 नंतर वयाची 18 वर्ष पूर्ण केलेल्यांना मतदार यादीत समाविष्ट करुन घ्यावं अशा मागण्या विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केल्या. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, शेकापचे जयंत पाटील, समाजवादी पक्षाचे रईस शेख यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

**निवडणूक आयुक्त**

मतदार यादीत नव्यानं नावं समाविष्ट करणं, अथवा वगळणं किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचं राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल स्पष्ट केलं. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची काल मुंबईत बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

**पूरग्रस्तांना दिलासा - धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील साडेसांगवी ही गांव पुराच्या तडाख्याने उद्ध्वस्त झालं आहे. पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी काल इथल्या पूरग्रस्तांबरोबर दिवाळी साजरी केली. याविषयी सविस्तर माहिती देणारा हा वृत्तांत....

**मागील काही दिवसांपूर्वी धाराशिव जिल्ह्यात कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे भूम तालुक्यातील साडेसांगवी या गावात पुराच्या पाण्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले, आपत्तीमुळे गावावर आलेल संकट यामुळे जमीन हादरली, परंतु माणसाचा विश्वास आत्मविश्वास डगमगला नाही, या वाक्यात साडेसांगवीकरांच्या जिद्दीच कौतुक करता येईल, पुराच्या तडाख्यात सापडलेल्या या गावात पालकमंत्री श्री प्रताप सरनाईक यांनी काल गावकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या मनात पुन्हा आशेचे दिवे पेटवले. गावकऱ्यांच्या दुःखात सहभागी होत पालकमंत्र्यांनी त्यांना जगण्याचं बळ दिलं, साडेसांगवी पुन्हा फुलवणं ही जबाबदारी आहे अस सांगून सरनाईक यांनी गावकऱ्यांच्या दुःखावर फुंकर घातली. अतिवृष्टीच्या काळात पुरामुळे गावातला पूल तीन-चार दिवस पाण्याखाली होता, त्यामुळे ग्रामस्थांची गैरसोय झाली ही गैरसोय टाळण्यासाठी लवकरच गावाजवळील नदीवर दोन ठिकाणी पूल आणि अडीच किलोमीटरचा रस्ता याचं भूमिपूजन त्यांनी करून यासाठी निधीची कमतरता पडणार नाही अशी ग्वाही देखील ग्रामस्थांना दिली. पालकमंत्र्यांच्या हस्ते गावातील काही ग्रामस्थांना प्रतिनिधिक स्वरूपात दिवाळी निमित्त संसार उपयोगी साहित्य, भेटवस्तूंच वाटप करण्यात आलं. आपत्तीच्या काळात पालकमंत्र्यांनी पूरग्रस्तांच्या दुःखात सहभागी होत आपली सामाजिक संवेदना जागी ठेवून कृतार्थभाव जागवला यामुळ पूरग्रस्तांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत. देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर धाराशिव.**

**<u>पशुधन-लातूर</u>**

अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे लातूर जिल्ह्यात अनेक पशुपालकांचं पशुधन मृत झालं आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने एक संवेदनशील उपक्रम हाती घेतला आहे. पूर परिस्थितीत गमाविलेल्या पशुधनाच्या बदल्यात जिल्ह्यातील विविध गोशाळांमधील गायी, बैल, कालवडी, गोऱ्हे पशुपालकांना देण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयातून हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

**<u>सीसीटीव्ही-सिंधुदुर्ग</u>**

सिंधुदुर्गातल्या समुद्र किनाऱ्यांवर एआय-आधारित सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहेत. देवगड, मालवण आणिवेंगुर्ले यांसारख्या समुद्रकिनाऱ्यांवर हे सीसीटीव्ही कॅमेरे लावणार असल्याचं पालकमंत्री नितेश राणे यांनी सांगितलं.

**<u>निधन</u>**

सातारा इथले ज्येष्ठ कर सल्लागार, साहित्यिक, चित्रपट निर्माते आणि सामाजिक नेते अरुणराव गोडबोले यांचं काल निधन झालं. ते 82 वर्षांचे होते. अनेक संस्थांमधून त्यांनी विविध पदांवर काम केलं होतं. कविता, प्रवासवर्णन, ललित, संत साहित्य, अशा विविध प्रकारचं साहित्यही त्यांनी लिहिलं.

**<u>क्रिकेट</u>**

वेस्ट इंडीजविरुद्धचा दुसरा कसोटी सामना भारतानं काल 7 गडी राखून जिंकला. या विजयामुळं भारतानं ही मालिकाही 2-0 अशी जिंकली आहे. वेस्ट इंडिज विरोधात कसोटी मालिकेतला भारताचा हा सलग 10 वा विजय आहे. या सामन्यात कुलदीप यादव सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला तर रवींद्र जडेजाला मालिकावीर घोषित करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकणात तुरळक ठिकाणी पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.